# इतिहास – राज्यशास्त्र

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 4 थी

**प्र. 1. (अ)**

(1) इसवी सनाच्या सातव्या शतकात बाणभट्ट या कवीने लिहिलेले 'हर्षचरित' हे संस्कृत काव्य ऐतिहासिक चरित्रग्रंथाच्या स्वरूपाचे आहे.

(2) मराठी भाषेतील 'दिग्दर्शन' हे पहिले नियतकालिक बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केले.

(3) चारधाम, बारा ज्योतिर्लिंगे यांमधील बहुसंख्य ठिकाणी लोकांची सोय व्हावी; म्हणून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली.

**प्र. 1. (ब) चुकीच्या जोड्या :**


(1) 'द इंडियन वॉर ऑफ इंडिपेन्डन्स : १८५७' – मार्क्सवादी इतिहास.

(2) दक्षिणेकडील मंदिरे – नागर स्थापत्यशैली.


(3) मराठी विश्वकोश – रघुनाथ भास्कर गोडबोले.

**प्र. 2. (अ)**


**(1)**




**(2)**



**(3)**




**प्र. 2. (ब)**

**(1) मराठा चित्रशैली :**

इसवी सनाच्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठा चित्रशैली विकसित होण्यास सुरुवात झाली.

(१) सचित्र हस्तलिखित पोथ्या, पोथ्यांच्या खाली आणि वर ठेवण्यात येणाऱ्या लाकडी फळ्यांवरील चित्रे, काचचित्रे आणि भित्तिचित्रे या विविध स्वरूपांत मराठा चित्रशैलीचा आविष्कार आढळतो.

(२) या शैलीतील चित्रे रंगीत असून ती भित्तिचित्रे आणि हस्तलिखितांमधील लघुचित्रे यांच्या स्वरूपांतील आहेत.

(३) वाड्यांचा दर्शनी भाग, दिवाणखाने, मंदिरांचे मंडप, शिखरे व छत यांवर मराठा चित्रशैलीतील भित्तिचित्रे पाहण्यास मिळतात.

(४) या चित्रशैलीवर राजपूत आणि माळवा चित्रशैलीचा; तसेच युरोपीय चित्रशैलीचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

**(2) खेळणी आणि उत्सव :**

उत्सव व खेळणी यांचा प्राचीन काळापासूनच घनिष्ठ संबंध आहे.

(१) विविध संस्कृतींत आणि धर्मांत उत्सवप्रसंगी विविध खेळण्यांनी सजावट केली जाते. लहान मुलांना खेळण्यांचे वाटप केले जाते. सँटॉक्लॉज नाताळमध्ये मुलांना खेळणीच देऊन जातो.

(२) दीपावलीच्या उत्सवात महाराष्ट्रात मातीच्या किल्ल्यांवर शिवराय व सैनिकांच्या प्रतिमा ठेवतात, ती खेळणीच असतात.

(३) गावोगावच्या जत्रा व उत्सवप्रसंगी बाजारात मोठ्या प्रमाणात खेळण्यांची दुकाने लागतात.

(४) बैलपोळा, नागपंचमी अशा सणांप्रसंगी मातीचे बैल, गाडी, नागोबा अशी खेळणी तयार केली जातात. मुले या खेळण्यांशी खेळतात, स्पर्धा लावतात. संक्रांतीच्या दिवशी मुले पतंग उडवतात.

**(3) विश्वकोश :**

(१) 'विश्वकोश' म्हणजे असा ग्रंथ की, ज्यात विश्वातील सर्व ज्ञान विषयानुरूप साररूपात एकत्र केलेले असते.

(२) विश्वकोश हे ज्ञानसंग्रहाचे व ज्ञानप्रसाराचे एक मुख्य साधन मानले जाते.

(३) विश्वकोशातील माहिती संशोधनपूर्ण आणि अभ्यासपूर्ण असल्याने ती विश्वासार्ह असते.

(४) विश्वकोशाचे सर्वसंग्राहक विश्वकोश आणि विशिष्ट विषयावरचे विश्वकोश असे दोन प्रकार पडतात.

**प्र. 3.**

**(1)** (१) मायकेल फुको यांनी कालक्रमानुसार इतिहासाची अखंड मांडणी करण्याची पद्धती चुकीची ठरवली.

(२) त्यांच्या मते, अंतिम सत्यापर्यंत पोहोचणे, हे पुरातत्त्वाचे उद्दिष्ट नसते.

(३) भूतकाळातील स्थित्यंतरांचे, म्हणजेच बदलांचे स्पष्टीकरण देण्याचा पुरातत्त्वाचा प्रयत्न असतो.

(४) फुको यांनी इतिहासातील स्थित्यंतरांचे स्पष्टीकरण देण्यावर अधिक भर दिला; म्हणून त्यांच्या लेखनपद्धतीला 'ज्ञानाचे पुरातत्त्व' असे म्हटले आहे.

**(2)** (१) कठपुतळ्यांच्या किंवा चित्रांच्या साहाय्याने रामायण-महाभारतातील कथा सांगण्याची परंपरा म्हणजे 'चित्रकथी परंपरा' होय.

(२) या परंपरा आपल्या संस्कृतीच्या घटक असून, तो आपला वैभवशाली वारसा आहे.

(३) ठाकर, आदिवासी, वारली अशा जमातींनी चित्रकथी परंपरा पिढ्यान्‌पिढ्या टिकवून ठेवली आहे.

(४) चित्रकथी कुटुंबांमध्ये जतन करून ठेवलेल्या पोथ्या आता जीर्ण झाल्या आहेत.

म्हणून नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या चित्रकथीसारख्या या परंपरांचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे.

**(3)** (१) विसाव्या-एकविसाव्या शतकात खेळांचे आंतरराष्ट्रीयीकरण झाले आहे.

(२) सर्वच सामन्यांचे थेट प्रक्षेपण जगाच्या कानाकोपऱ्यात एकाच वेळी होत असते. ज्यामुळे हौशी खेळाडू शिकण्यासाठी; तर प्रेक्षक मनोरंजनासाठी सामने पाहतात.

(३) निवृत्त खेळाडूंना समालोचनासाठी विविध वाहिन्यांवर बोलावले जाते.

(४) सामने पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रेक्षकवर्ग येतो. त्यामुळे कंपन्या मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करून आपल्या उत्पादनाच्या जाहिराती खेळांच्या प्रक्षेपणादरम्यान करीत असतात. या कारणांमुळे सध्याच्या काळात खेळांचे अर्थकारण बदलले आहे.

**(4)** (१) भूतकाळात होऊन गेलेल्या व्यक्ती, घटना, प्राचीन संस्कृती यांवर कोशांची रचना होत असते.

(२) कोशांची रचना करणाऱ्याला या सर्वांची माहिती मिळवण्यासाठी इतिहासाचा आधार घ्यावाच लागतो.

(३) इतिहास आणि कोश यांच्यातील समान धागा म्हणजे त्यातील वस्तुनिष्ठता आणि सत्यता. ही सत्यता येण्यासाठी कोशकारांना इतिहासात डोकवावेच लागते.

(४) इतिहासाच्या अभ्यासकालाही कोशांतील घटना, व्यक्ती, संज्ञा, ठिकाणे यांचा अभ्यास करण्यासाठी कोशांची मदत घ्यावीच लागते; कारण कोशांची रचना इतिहासाच्या आधारेच झालेली असते.

म्हणून कोणत्याही कोशाला इतिहासाची जोड देणे आवश्यक असते.

**प्र. 4.**

**(1)** 'भारत एक खोज' ही मालिका पंडित नेहरू यांनी लिहिलेल्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथावर आधारित आहे.

**(2)** 'भारत एक खोज' या मालिकेचे दिग्दर्शन श्याम बेनेगल यांनी केले आहे.

**(3)** 'भारत एक खोज' ही मालिका लोकप्रिय ठरण्यास पुढील घटक कारणीभूत असावेत, असे मला वाटते—

(१) या मालिकेत प्राचीन काळ ते अर्वाचीन काळ यादरम्यानचा सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय इतिहास मांडला गेला आहे.

(२) भारताच्या कानाकोपऱ्यातील समाजजीवन, संस्कृती, कला, साहित्य यांवर प्रकाश टाकला गेल्याने लोकांना ते पाहताना पुन:प्रत्ययाचा आनंद मिळाला.

(३) सखोल संशोधन आणि प्रभावी सादरीकरण यांमुळे ही मालिका लोकप्रिय ठरली.

(४) पंडित नेहरूंचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन, या मालिकेतील नाट्य, लोककला आणि प्रबोधनपर माहिती यांचाही लोकांवर खूप प्रभाव पडला.

**प्र. 5.**

**(1)** इतिहासाच्या साधनांत लिखित, भौतिक आणि मौखिक साधने यांचा समावेश होतो. या साधनांचे वेगवेगळ्या पद्धतीने जतन करावे लागते. त्यासाठी माझ्या मते पुढील उपाययोजना कराव्यात—

(१) किल्ले, स्मारके, राजवाडे अशा ऐतिहासिक वास्तूंची नियमित डागडुजी केली पाहिजे. वास्तूंची नासधूस करणे, त्यावर नावे लिहिणे वा कोरणे हे टाळण्याबाबत उपाय योजावेत.

(२) ऐतिहासिक नाणी, हत्यारे इत्यादी वस्तू जपून हाताळाव्यात. त्यांची चोरी होणार नाही याची काळजी घ्यावी. ऐतिहासिक साधनांच्या जतनासाठी कडक कायदे करावेत.

(३) ओव्या, लोकगीते आदी मौखिक साहित्याचे संकलन करून ते लिखित स्वरूपात आणावे.

(४) प्राचीन ग्रंथांचे वाळवी व बुरशी यांपासून संरक्षण करावे. ओलसरपणा, दमट हवा यांमुळे बुरशी लागते. म्हणून त्यांना पाणी लागणार नाही याची काळजी घ्यावी. कीटकनाशक औषधांचा वापर करावा.

(५) या सर्व साधनांच्या जतनासाठी अनुभवी तज्ज्ञ मंडळींचे सल्ले घ्यावेत.

(६) या साधनांचे महत्त्व समाजाला पटवून देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेऊन समाजाचे प्रबोधन करावे; ज्यामुळे या साधनांच्या जतनात समाज मोठ्या प्रमाणात सामील होईल.

**(2)** (१) बाहुल्यांच्या खेळाच्या राजस्थानी व दाक्षिणात्य अशा दोन पद्धती आहेत. राजस्थानी पद्धतीच्या बाहुलीला 'कठपुतळी' असे म्हणतात. या बाहुल्या प्रामुख्याने लाकडी असून त्यावर कापड व कातडे यांचा वापर केला जातो. दाक्षिणात्य बाहुल्या आकाराने मोठ्या असतात.

(२) राजस्थानी पद्धतीत ऐतिहासिक व्यक्ती व प्रसंगांवर भर असतो; तर दाक्षिणात्य पद्धतीत पौराणिक प्रसंगांना प्राधान्य असते.

(३) लाकूड, लोकर, कातडे, शिंगे व हस्तिदंत यांचा वापर बाहुल्या बनवण्यासाठी केला जातो.

(४) कठपुतळीचा प्रयोग रंगण्यासाठी सूत्रधाराचे कौशल्य अत्यंत महत्त्वाचे असते. बाहुल्यांना काळ्या धाग्याने जोडून प्रेक्षकांना न दिसेल अशा पद्धतीने कलाकार बोटांच्या हालचालींनी बाहुल्यांना नाचवत असतो. सूत्रधार बोलेल त्याप्रमाणे बाहुल्यांची हालचाल व नृत्य होते.

(५) लहान रंगमंच, प्रकाश व ध्वनी यांचा कल्पकतेने वापर केला जातो. बाहुल्यांचे छाया-बाहुली, हात-बाहुली, काठी-बाहुली व सूत्र-बाहुली असे प्रकार आहेत.

(६) उत्तर प्रदेश, आसाम, महाराष्ट्र, राजस्थान, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, केरळ अशा अनेक राज्यांत कठपुतळीचा खेळ कलावंत सादर करीत असतात.

**(3)** पर्यटनामागे अनेक हेतू वा प्रेरणा असतात. त्या पुढीलप्रमाणे –

(१) ऐतिहासिक वास्तू, किल्ले तसेच उत्खननात सापडलेली गावे-शहरे पाहणे. प्राचीन कलानिर्मितीची केंद्रे, संग्रहालये पाहणे.

(२) विविध तीर्थस्थळांना भेटी देणे; समुद्रकिनारे, घनदाट जंगले, हिमशिखरे, नद्यांचे संगम, कास पठारासारखी वैशिष्ट्यपूर्ण पठारे, फ्लॉवर ऑफ व्हॅलीसारख्या दऱ्या-पर्वत अशा निसर्गरम्य स्थळांचा अनुभव व आनंद घेणे.

(३) निरनिराळ्या औद्योगिक प्रकल्पांना भेटी देणे; औषधी वनस्पती पाहणे, संशोधन करणे, वैद्यकीय उपचार घेणे अशा आरोग्यपूरक कारणांसाठी पर्यटन करणे.

(४) फळबागा, शेती संशोधन, शेती प्रकल्प, खतनिर्मिती प्रकल्प आदींसाठी केलेले कृषी पर्यटन.

(५) खेळ, नृत्य, संगीत, महोत्सव यांत भाग घेणे वा प्रेक्षक म्हणून जाणे हे सांस्कृतिक पर्यटन.

(६) याशिवाय फिल्म फेस्टिव्हल, चित्रपट चित्रीकरण, विज्ञान संमेलने, आंतरराष्ट्रीय परिषदा, संवाद, पुस्तक प्रदर्शने, साहित्य संमेलने इत्यादी निमित्तानेही लोक पर्यटन करीत असतात.

**(4)** (१) जगातील सर्वाधिक प्राचीन म्हणजे सुमारे ४५०० वर्षांपूर्वीचा हा शिलालेख असून, तो फ्रान्सच्या लुव्र संग्रहालयात ठेवण्यात आला आहे.

(२) या शिलालेखात मेसोपोटेमियातील सुमेर संस्कृतीतील राजांच्या आणि दोन राज्यांमध्ये झालेल्या युद्धांच्या नोंदी आहेत.

(३) हातात ढाल आणि भाला घेतलेल्या सैनिकांची शिस्तबद्ध रांग आणि या सैनिकांचे नेतृत्व करणारे सेनानी या चित्रात दिसत आहेत.

## प्र. 6.

**(1)** भारतात १८ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार मिळाला आहे.

**(2)** शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी हरितक्रांती करण्यात आली.

## प्र. 7.

**(1)** हे विधान बरोबर आहे; कारण –

(१) भारतीय संविधानाने स्वातंत्र्यपूर्व काळातील मतदानाच्या अधिकारासाठी असणारी सर्व बंधने रद्द केल्यामुळे मतदारांची संख्या वाढली आहे.

(२) संविधानाने स्वीकारलेल्या प्रौढ मताधिकाराच्या तरतुदीमुळे सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे.

(३) सुरुवातीस मताधिकारासाठी असणारी २१ वर्षांची अट नंतर १८ वर्षे पूर्ण अशी करण्यात आल्यामुळे मताधिकार अधिक व्यापक झाला. मतदारांची एवढी संख्या जगातील कोणत्याच लोकशाही देशात नाही; म्हणून भारतीय लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जाते.

**(2)** हे विधान बरोबर आहे; कारण –

(१) राजकीय पक्ष जनतेच्या मागण्या आणि गाऱ्हाणी शासनापर्यंत पोहोचवण्याचे कार्य करतात.

(२) शासन पक्षांमार्फत आपल्या धोरणांची, योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून त्यांचा या कार्यक्रमांना पाठिंबा मिळवतात.

(३) या धोरणांवरील जनतेच्या प्रतिक्रिया सरकारला सांगण्याचे कामही राजकीय पक्षच करतात.

अशा रितीने राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.

**(3)** हे विधान चूक आहे; कारण –

(१) जमीनदारांनी शेतकरी आणि आदिवासी यांच्या जमिनी बळकावल्या.

(२) यामुळे हा अन्याय दूर करून भूमिहीनांना जमिनी परत मिळवून देण्यासाठी नक्षलवाद्यांनी, म्हणजेच डाव्या उग्रवाद्यांनी चळवळ सुरू केली.

(३) परंतु, मूळ उद्देश बाजूला पडून ही चळवळ सरकारविरोधात हिंसक कारवाया करू लागली, पोलिसांवर हल्ले करू लागली. हिंसेलाच अधिक महत्त्व आले. म्हणून डाव्या उग्रवादी चळवळीत आज शेतकरी व आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व कमी झाले आहे.

**प्र. 8. (अ)**

**(1) मतपेटी ते ईव्हीएम मशीनपर्यंतचा प्रवास :**

(१) १९५१ – ५२ च्या लोकसभेच्या पहिल्या निवडणुकीपासून मतपेट्यांचा वापर केला जात असे. या पहिल्या निवडणुकीत मतदानासाठी स्टीलच्या वीस लाख मतपेट्या वापरल्या गेल्या होत्या. नंतरच्या काळात मतदार मतपत्रिकेतील उमेदवाराच्या नावासमोर शिक्का मारून त्या मतपेटीत टाकत असत.

(२) १९९८ साली पहिल्यांदा मध्य प्रदेशातील ५, राजस्थानातील ५ व दिल्लीतील ६ अशा १६ विधानसभा मतदारसंघांत इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनचा (EVM) वापर केला गेला.

(३) २००४ च्या लोकसभा निवडणुकीपासून ईव्हीएमचा नियमित वापर सुरू झाला.

(४) ईव्हीएम मशीनच्या वापरामुळे देशाचे अनेक फायदे झाले. आता, ईव्हीएम मशीनमध्ये मतदारांची पडताळणी पावती ही सुविधा निर्माण झाली आहे.

**(2) जमातवाद व दहशतवाद :**

(१) जमातवाद आणि दहशतवाद देशासाठी हानिकारक असतो. धार्मिक श्रेष्ठत्वाची भावना व अन्य धर्मीयांविषयी द्वेषभावना निर्माण होण्याने जमातवाद निर्माण होतो. वाढता जमातवाद दहशतवादाला जन्म देतो.


(२) वाढत्या जमातवादाने देशात धार्मिक संघर्ष सुरू होतात.

(३) वाढत्या संघर्षामुळे समाजात धार्मिक तेढ निर्माण होऊन सामाजिक ऐक्य नष्ट होते.


(४) समाजात दुही निर्माण होऊन दहशतवादी घटना घडून येतात. परिणामी, सामाजिक स्थैर्य व स्वास्थ्य नष्ट होऊन लोकशाही धोक्यात येते. लोकांचा लोकशाहीतील सहभाग कमी होतो. जमातवादाने देशाचे अतोनात नुकसान होते.

**प्र. 8.** **(ब)**

**(1)**




**(2)**




**प्र. 9.**

**(1)** (१) प्रत्येक मतदारसंघात अनुसूचित जाती व जमातींची संख्या विखुरलेली असते. त्यामुळे या लोकसमूहांना प्रतिनिधित्व मिळणे अवघड असते.

(२) प्रतिनिधित्वाशिवाय त्यांच्या समस्यांना सभागृहात वाचा फोडणे अशक्य होईल.

(३) प्रतिनिधित्व न मिळाल्यास या लोकसमूहांना सामाजिक न्याय व समानता मिळणार नाही.

(४) त्यांची प्रगती थांबेल. म्हणून अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या हक्कांच्या रक्षणासाठी काही मतदारसंघ राखून ठेवले जातात.

**(2)** (१) स्वातंत्र्यपूर्व काळातच शेतीविरोधी धोरणांमुळे भारतीय शेतकरी संघटित होऊन चळवळी करू लागला होता.

(२) महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, महात्मा गांधी यांसारख्या नेत्यांच्या प्रेरणेतून बार्डोली, चंपारण्य या ठिकाणी शेतकऱ्यांचे मोठे सत्याग्रह झाले. किसान सभेसारख्या संघटना स्थापन झाल्या.

(३) स्वातंत्र्योत्तर काळात कूळ कायद्यासारख्या कायद्यांनी शेतकरी चळवळी मंदावल्या. हरितक्रांतीने गरीब शेतकऱ्यांची स्थिती सुधारली नाही.

(४) शेती मालाला योग्य भाव मिळावा, कर्जमुक्ती व्हावी आणि स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकाराव्यात; म्हणून शेतकरी चळवळी पुन्हा जोर धरू लागल्या आहेत.